# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

**दिनांक : २४/०९/२०२४.**

## निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील तालुक्यांतील व पालघर जिल्हयाअंतर्गत येणा-या आस्थापनांवर "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषध फवारणीसाठी व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन)" सेवा पुरवठा करणेसाठी कार्यालयीन अटी व शर्ती अनुसरून नोंदणीकृत/ परवानाधारक सेवा/शासकीय आस्थापनांना सेवा पुरविणा-या स्थानिक पुरवठादारांकडून बंद स्वरुपात निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी, इच्छुक पुरवठादारांनी दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायं. ५.३० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर मोहोरबंद लखोट्यात दरसुचीसह निविदा/दरपत्रक सादर करावेत. उपरोक्त तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचा राहील.

पत्ता :- जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,<br>कोर्टनाका, ठाणे (प.) पीन ४००६०१.

सोबत कार्यालयीन माहिती, अटी व शर्ती जोडण्यात आली आहे. सदरबाबत अधिक माहिती घेणेसाठी सहाय्यक अधीक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडे कामाच्या दिवशी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

DISTRICT COURT जिल्हा न्यायालय ठाणे THANE

हुकूमावरून,

ठाणे.<br>दि. २३/०९/२०२४.

प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>ठाणे.

**दिनांक : २४/०९/२०२४**

## <u>वाळवी प्रतिबंधक उपाययोजनाबाबत अटी व शर्ती</u>

१. जिल्हा न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांतील (व पालघर जिल्हयाअंतर्गत येणा-या आस्थापनांवर) अशा एकुण ३६ आस्थापनांवर वाळवी प्रतिबंधक उपाययोजना म्हणजेच वाळवी नाशक औषध फवारणी व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन) बाबतचा करार करण्यासाठी कंत्राटदाराने त्यांनी इतर शासकीय निमशासकीय आस्थापनां किंवा फॅक्टरी, दुकाने, इतर संस्थांबरोबर काम केल्याबाबतच्या अनुभवाचे दाखले किंवा आदेशपत्र तसेच पॅनकार्ड, दुकानाचे लायसन्स् इ. निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२. कंत्राटदाराने निविदा देताना वाळवीनाशक फवारणी व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन) करीता एका आस्थापनेसाठी येणा-या खर्चाची निविदा सादर करावी. वाळवीनाशक फवारणी व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन) करण्यात येणारे अभिलेख कक्ष व मुद्देमालकक्षांची संख्या भविष्यात वाढण्याची किंवा कमी होण्याची शक्यता आहे याला अनुसरुन कंत्राटदाराने निविदा देण्यात याव्यात. नंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

३. पूर्वसुचना न देता अथवा कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा अथवा अस्विकार करण्याचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ठाणे यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी.

४. ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळालेपासून १० दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक असेल.

५. जिल्हा न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील एकुण ३६ आस्थापनांवरील <u>अभिलेख कक्ष, मुद्देमालकक्ष व निकाली दाव्यांचे इतरत्र ठेवलेले गठ्ठे तसेच फर्निचर</u> सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

६. कंत्राटदाराने वर्षातुन चार वेळा फवारणी करावी. फवारणी करण्याअगोदर संबंधीत आस्थापनेस लेखी पुर्वसुचना दयावी. फवारणी न्यायालयाचे नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांचे समक्ष किंवा निरिक्षणा खाली करावी व तसे केल्याचे सबंधीत अधिकारी / कर्मचा-यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

७. कंत्राटदारास सदर कंत्राट कोणत्याही परिस्थीतीत इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीस पोटभाडयाने देता येणार नाही.

८. वाळवी नाशक फवारणी अंतर्गत करण्यात येणा-या करारापोटी कंत्राटदाराला संबंधीत आस्थापनांकडुन फवारणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच जिल्हा न्यायालयाकडुन देयक दिले जाईल. सदरची देयके ही एकुण ४ फवारणीची अशी ४ देयके राहतील व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन) अंतर्गत वर्षातुन एकच देयक असेल याची दखल घ्यावी.

९. पालघर जिल्हयाअंतर्गत येणा-या आस्थापनांकरिता येणारा खर्च पालघर जिल्हयाअंतर्गत येणा-या कार्यालयीन खर्चाचे अनुदानातुन दिले जाईल. त्याबाबतचे देयक सेवापुरवठादारास वेगळे दयावे लागेल. म्हणजेच ठाणे जिल्हया अंतर्गत येणा-या आस्थापनांकरिता वेगळे देयक व पालघर जिल्हयाअंतर्गत येणा-या आस्थापनांकरिता वेगळे देयक दयावे लागेल.

१०. करारापोटी देण्यात येणारे देयक मिळणेकामी तगादा लावु नये. देयक अदा करण्याबाबत योग्य ती नियमानुसार कार्यवाही करुनच देयक लवकरात लवकर अदा करण्यात येईल.

११. कंत्राटदाराने संबंधीत आस्थापनांचे अभिलेख कक्ष, इतरत्र ठेवलेले गठ्ठे व मुद्देमाल कक्ष यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२. कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही न्यायालयीन कामाच्या बाबी येतील त्या न्यायालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्याबाबत आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करून कंत्राट रद्द करणेत येईल.

१३. या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना हे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे विहीत केलेल्या गुणवत्तेनूसार ते काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

१४. कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचे आढळल्यास, सदरची नुकसान भरपाई ही कंत्राटदारास देय असलेल्या रकमेतून वसूल करण्यात येईल.

१५. कंत्राटदाराचे काम असमाधानकारक असल्याची जिल्हा न्यायालयाकडे संबंधित आस्थापनांकडून तक्रार आल्यास तक्रारीची शहनिशा करुन तक्रारीत तथ्य असल्यास कंत्रादारासोबत करण्यात आलेला करार कोणतीही नोटीस न देता रद्द करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे राहील.

ठाणे.
दि. २४/०९/२०२४.

DISTRICT COURT THANE

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे.